# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः07.08.2024** **वारःबुधवार**

---

1. बांग्लादेशचे हंगामी पंतप्रधान म्हणून डॉक्टर मोहम्मद युनुस यांची नियुक्ती
2. बांग्लादेशमधला भारतीय दूतावास तिथल्या भारतीय नागरिकांच्या सतत संपर्कात
3. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून तीन दिवसांच्या न्यूझीलंड दौऱ्यावर
4. राष्ट्रीय हातमाग दिनानिमित्त आज दिल्लीमध्ये विशेष कार्यक्रमाचं आयोजन आणि
5. पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेत कुस्तीमध्ये भारताचं पदक निश्चित, विनेश फोगटनं रचला इतिहास

**बांग्लादेश सरकार**

बांग्लादेशचे राष्ट्राध्यक्ष मोहम्मद शहाबुद्दीन यांनी तिथली संसद बरखास्त करुन हंगामी सरकारच्या पंतप्रधानपदी मोहम्मद युनुस यांची नेमणूक केली आहे. लष्कराच्या तिनही दलांचे प्रमुख आणि आरक्षणविरोधी विद्यार्थी चळवळीच्या शिष्टमंडळासोबत काल झालेल्या बैठकीनंतर त्यांनी हा निर्णय जाहीर केला. सरकारमधल्या अन्य मंत्र्यांची निवड विविध राजकीय पक्षांशी सल्लामसलत करुन केली जाईल अशी माहिती राष्ट्रपतींच्या जनसंपर्क सचिवांनी माध्यमांना दिली. दरम्यान बांग्लादेशच्या माजी पंतप्रधान खालिदा झिया यांची स्थानबद्धतेतून सुटका करण्यात आली आहे.

**बांग्लादेश**

बांग्लादेशमधलं भारतीय दूतावासाचं कार्यालय तिथल्या भारतीय नागरिकांच्या सतत संपर्कात असल्याचं काल सरकारनं संसदेत सांगितलं. तिथल्या अल्पसंख्याकांच्या बाबतीतल्या परिस्थितीवर सरकार लक्ष ठेवून आहे असं परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर एस. जयशंकर बांग्लादेशमधल्या स्थितीवर चर्चा करताना म्हणाले. या घडीला 19 हजार भारतीय नागरिक बांग्लादेशात आहेत. यात 9 हजार विद्यार्थ्यांचा समावेश आहे. भारतीय उच्चायुक्तालयाच्या सूचनेनंतर बरेच विद्यार्थी गेल्या महिन्यात भारतात परतले असल्याची माहिती परराष्ट्र मंत्र्यांनी दिली.

**मणिपूर कर्फ्यू**

बांगलादेशमधील अराजक आणि अस्थिर राजकीय परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर तिथून होणाऱ्या संभाव्य बेकायदेशीर स्थलांतराला आळा घालण्यासाठी मणिपूर सरकारनं फेरझॉल आणि जिरीबाम या सीमावर्ती जिल्ह्यांमध्ये रात्रीची संचारबंदी लागू केली आहे. दोन्ही जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी हे मनाई आदेश जारी केले आहेत. बंदुक, तलवारी, काठ्या, दगड किंवा इतर प्राणघातक शस्त्र किंवा शस्त्र म्हणून वापरता येतील अशा कोणत्याही धारदार वस्तू बाळगण्यास या आदेशाद्वारे बंदी घालण्यात आली आहे. जिरीबाम जिल्ह्यात सकाळी 9 ते दुपारी 3 वाजेपर्यंत हे प्रतिबंधात्मक आदेश शिथिल केले जातील, असंही स्पष्ट करण्यात आलं आहे.

**<u>सीतारामन</u>**

बँकांमधल्या पंतप्रधान जनधन योजनेच्या खात्यांना तसंच बचत खात्यांना किमान शिल्लक रकमेचा नियम लागू नसल्याचं स्पष्टीकरण केंद्रिय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी दिलं आहे. त्या काल राज्यसभेत प्रश्नोत्तराच्या तासात बोलत होत्या. किमान शिल्लक रकमेचा नियम न पाळल्याबद्दल विविध बँकांनी खातेदारांना दंड आकारल्याचा मुद्दा राज्यसभेत उपस्थित करण्यात आला होता.

**<u>राष्ट्रपती</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं आज न्यूझीलंडमध्ये आगमन होईल. न्यूझीलंडचे राष्ट्रप्रमुख डेम सिंडी किरो यांनी राष्ट्रपतींना या तीन दिवसांच्या दौऱ्याचं निमंत्रण दिलं होतं. या दौऱ्यात त्या किरो यांच्यासह पंतप्रधान ख्रिस्तोफर लक्सॉन यांच्यासोबत द्विपक्षीय चर्चा करणार आहेत. राष्ट्रपती मुर्मू यांनी काल फिजीचे राष्ट्रपती रातू विलियम मैवलिली काटोनिवर यांच्याशी द्विपक्षीय चर्चा केली. भारत आणि फिजी यांच्यातलं सहकार्य आणखी वाढवण्याबाबत यावेळी चर्चा केल्याचं राष्ट्रपतींनी समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

**<u>लंडन सल्ला</u>**

युनायटेड किंग्डममधल्या गेल्या काही दिवसांतल्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर त्या देशात प्रवासाला जाताना सतर्क राहून काळजी घेण्याचा सल्ला लंडनच्या भारतीय उच्चायुक्तालयानं दिला आहे. भारतीयांनी युकेमध्ये येण्यापूर्वी इथल्या स्थानिक बातम्या आणि स्थानिक सुरक्षा संस्थांनी दिलेल्या सूचना लक्षात घ्याव्यात आणि निदर्शनं सुरू असलेल्या भागात प्रवास टाळावा असं उच्चायुक्तालयानं जारी केलेल्या सूचनेत नमूद केलं आहे.

**<u>रोजगार</u>**

रोजगार आधारित लाभ योजना अर्थात इएलआय योजना युद्धपातळीवर राबवावी आणि खऱ्या लाभार्थ्यांना त्याचा फायदा होईल याची खबरदारी घेण्यासाठी मजबूत यंत्रणा उभारावी असे आदेश केंद्रिय श्रम आणि रोजगार मंत्री डॉक्टर मनसुख मांडवीय यांनी दिले आहेत. सर्वसमावेशक आणि शाश्वत रोजगारनिर्मिती यंत्रणा उभारण्यासाठी सरकार वचनबद्ध असल्याचं त्यांनी या योजनेसंदर्भातल्या बैठकीत सांगितलं. रोजगार निर्मितीला प्रोत्साहन मिळेल तसंच नोकरी करणारे आणि नोकरी देणारे दोघांनाही लाभ होईल अशा रितीनं ही योजना आखण्यात आल्याचं मांडवीय यांनी सांगितलं.

**<u>हातमाग दिन</u>**

दहाव्या राष्ट्रीय हातमाग दिनानिमित्त नवी दिल्लीत आज विशेष कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्या हस्ते हातमाग क्षेत्रातील उत्कृष्ट योगदानासाठी विणकरांना संत कबीर पुरस्कार आणि राष्ट्रीय हातमाग पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. या कार्यक्रमादरम्यान उपराष्ट्रपतींच्या हस्ते पुस्तक प्रकाशनही होणार आहे. केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री गिरिराज सिंह, वस्त्रोद्योग राज्यमंत्री पवित्रा मार्गेरिटा, खासदार, डिझायनर, उद्योग प्रतिनिधी तसंच देशभरातील एक हजारहून अधिक विणकर या समारंभाला उपस्थित राहणार आहेत. उत्सवाचा एक भाग म्हणून देशभरात विविध उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

हातमाग क्षेत्राचं महत्त्व आणि देशाच्या सामाजिक-आर्थिक विकासात या क्षेत्राचं योगदान याबद्दल जागरूकता निर्माण करणं हा हातमाग दिन साजरा करण्याचा उद्देश आहे. त्यानिमित्तानं आपल्या कलाकुसरीतून देखणी वस्त्रनिर्मिती करणाऱ्या हातमाग विणकरांचा सन्मान करणं आणि हातमाग उद्योगामध्ये कार्यरत व्यक्तींमध्ये अभिमानाची भावना निर्माण करत त्यांना प्रेरणा देणं या व्यापक उद्देशानं हा दिवस आयोजित केला जातो.

**कमला हॅरिस**

अमेरिकेच्या उप राष्ट्राध्यक्ष कमला हॅरिस यांनी आगामी उप राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी टिम वॉल्झ यांची निवड केली आहे. हॅरिस यांना ऑनलाइन मतदानाच्या पाच टप्प्यांनंतर काल राष्ट्राध्यक्ष पदाच्या निवडणुकीसाठी डेमोक्रॅटिक पक्षाची अधिकृत उमेदवारी मिळाली. पक्षाच्या 99 टक्के सदस्यांनी हॅरिस यांच्या बाजूने कौल दिल्याचं डेमोक्रॅटिक पक्षानं आपल्या निवेदनात म्हटलं आहे.

**आरोग्यनिगा**

भारत वाजवी दरात जागतिक दर्जाचे औषधोपचार मिळणारं केंद्र म्हणून उदयास येत असून औषधनिर्मिती क्षेत्रातही अग्रस्थानी आहे असं केंद्रिय मंत्री डॉक्टर जितेंद्र सिंग यांनी म्हटलं आहे. ते काल नवी दिल्लीत जागतिक वैद्यकीयतंत्रज्ञान परिषदेत बोलत होते. भारताच्या भविष्यकालीन धोरणात प्रतिबंधात्मक औषधोपचाराला राष्ट्रीय प्राधान्य देण्यात आलं आहे असं सांगून त्यांनी आरोग्य विज्ञान क्षेत्रातल्या विकास आणि संशोधनासाठी जैव तंत्रज्ञान विभागानं केलेल्या प्रयत्नांची माहिती दिली. या क्षेत्रातली गुंतवणूक गेल्या दहा वर्षात तेरा पटींनी वाढल्याचं त्यांनी सांगितलं. उद्योग समुह आणि संशोधन संस्था यांच्यात चांगला मेळ साधण्याचं आवाहन जितेंद्र सिंग यांनी केलं.

**गुजरात धरणं**

गुजरातमधील 45 हून अधिक धरणं पूर्ण भरल्यानं विसर्ग सुरू असून त्यांना दक्षतेचा इशारा देण्यात आला आहे. राज्यातील सर्वात मोठ्या सरदार सरोवर धरणात 60 टक्के पाणीसाठा झाला आहे. दक्षिण गुजरातमधील मुसळधार पावसानंतर या विभागातील सर्वात मोठ्या धरणांपैकी एक असलेल्या उकाई धरणातही पाण्याची पातळी झपाट्याने वाढत आहे. दरम्यान, हवामान विभागानं उद्या राज्याच्या काही भागात मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे.

**वायनाड**

भूस्खलनानंतर उद्भवलेल्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर केरळमध्ये कॅबिनेट उपसमितीनं वायनाड परिसरात चालियार नदीच्या दोन्ही काठावर शोधमोहीम तीव्र करण्याचे निर्देश दिले आहेत. मृतदेह समुद्रात वाहून जाऊ नयेत यासाठी नौदल आणि तटरक्षक दलाची मदत घेण्यासही सांगितलं आहे. भूस्खलनात बळी पडलेल्या 22 अज्ञात मृतदेहांवर काल पुथुमाला इथल्या स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

**महाराष्ट्राकडून मदत**

केरळ आणि आसाम या पूरस्थितीमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेल्या राज्यांना महाराष्ट्र शासनानं प्रत्येकी 10 कोटी रुपयांची मदत जाहीर केली आहे. राज्य शासनानं काल यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला. केरळ आणि आसाम या राज्यांच्या मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये ही रक्कम जमा केली जाईल.

**ऑलिंपिक**

पॅरिस ऑलिंपिक स्पर्धेत विनेश फोगटनं काल इतिहास रचला आणि ती ऑलिम्पिक स्पर्धेच्या अंतिम फेरीत पोहोचणारी पहिली भारतीय महिला कुस्तीपटू ठरली. तिने 50 किलो वजनी गटात क्युबाच्या युस्नेलिस गुझमन लोपेझवर 5-0 असा विजय मिळवून अंतिम फेरीत आपलं स्थान निश्चित केलं. त्यामुळे तिला आता किमान रौप्यपदक मिळण्याची निश्चिती झाली आहे. टोकियो ऑलिम्पिकमध्ये भारताला सुवर्णपदक मिळवून देणारा भालाफेकपटू नीरज चोप्रा यानंही पॅरिस ऑलिम्पिकच्या अंतिम फेरीत स्थान मिळवलं आहे. हॉकीमध्ये मात्र भारताला उपांत्य लढतीत जर्मनीच्या संघाकडून 3-2 असा पराभव पत्करावा लागला. भारताला आता कांस्यपदकासाठी स्पेनविरुद्ध झुंज द्यावी लागणार आहे.

**क्रिकेट**

भारत आणि श्रीलंका यांच्यातील तिसरा आणि शेवटचा एकदिवसीय सामना आज कोलंबो इथं आर. प्रेमदासा स्टेडियमवर खेळला जाणार आहे. भारतीय प्रमाणवेळेनुसार  सामना दुपारी अडीच वाजता सुरू होईल. दुसरा एक दिवसीय सामना 32 धावांनी जिंकून श्रीलंकेनं मालिकेत 1-0 अशी आघाडी घेतली आहे. उभय देशांमधला पहिला सामना बरोबरीत सुटला होता. आजच्या सामन्यात विजय मिळवण्यासाठी भारतीय संघ पूर्ण ताकदीनिशी मैदानात उतरेल. 1997 पासून भारतानं श्रीलंकेविरुद्ध एकही मालिका गमावलेली नाही.

# याबरोबरच राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.